स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प.),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल :** vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./ / /25-26**
**दिनांक :**

## गणेशोत्सवाच्या अनुषंगाने वसई विरार शहरात महापालिकेकडून ठिकठिकाणी रस्त्याच्या डागडुजीचे काम युद्ध पातळीवर सुरू

पावसाळ्याच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासावर उपाययोजना करण्यासाठी वसई विरार शहर महापालिका प्रशासनाकडून युद्ध पातळीवर पावले उचलली जात आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे शहरात ठिकठिकाणी रस्त्याच्या डागडुजीचे काम मा.आयुक्त श्री. मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिलेल्या स्पष्ट निर्देशाने सुरू आहे. याच अनुषंगाने वसई विरार शहरात खड्डे बुजवण्याचे काम प्राधान्याने सुरू करण्यात आले असून या आठवड्यात आतापर्यंत ८५४ खड्डे खडीकरण डांबरीकरणाने बुजविण्यात आले आहेत. वसई विरार शहर महानगरपालिकेत खड्डे बुजविण्याचे काम युद्ध पातळीवर चालू असून खड्डेमुक्त प्रवासाचा अनुभव देण्यासाठी सर्व विभाग समन्वयाने कार्यरत असून नागरिकांनी महानगरपालिकेला सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.